MHKO180002482026

**<u>संक्षीप्त फौजदारी खटला क्र.१३१/२०२६</u>**
**<u>महाराष्ट्र सरकार वि. अनसार अबुसुफियान नदाफ</u>**

:: **<u>न्या य नि र्ण य</u>** ::
**निशाणी क्र.०७ लगत**
(अधिघोषित दिनांक ०२.०७.२०२६)

अभियोगपक्षातर्फे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील श्री. सं.सि.नदाफ व आरोपीतर्फे विद्यमान वकील श्री. प्र.व.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे कारण मिमांसासहित खालीलप्रमाणे –

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | घटनेवेळी आरोपी हा स्वत:च्या फायदयाकरीता लोकांकडून पैसे घेवून कल्याण नावाचा जुगार चालवित होता, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| २. | आदेश काय ? | ... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०३. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच मोहन शांतिनाथ माणगावे यांची एकमेव साक्ष निशाणी क्र.०७ लगत नोंदविली आहे. त्यानंतर, तक्रारदार पोलीस शिपाई सचिन क–याप्पा पुजारी, तपासीक अंमलदार पोलीस हवालदार विवेक महावीर कराडे, घटनास्थळ पंचनामा तयार करणारे पोलीस हवालदार संतोष साबळे, पंच शरद यशवंत पवार व उर्वरीत साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्याकरीता अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने उक्त साक्षीदारांना न्यायालयासमक्ष हजर केले नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपीस गुन्ह्यात गोवण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणला नसल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ करीता** :-

०४. पंच मोहन यांनी दिनांक १९.१२.२०२५ रोजी पोलीसांनी एका कागदावर त्यांची सही घेतल्याचे कथन केले आहे. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सही त्यांची असली तरी त्यातील मजकूराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. पंच मोहन हे अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, पंच मोहन यांच्या साक्षीपुराव्यातुन अभियोगपक्षास प्रस्तुत प्रकरणातील घटना आणि घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०५. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने तक्रारदार, दुसरे पंच शरद, घटनास्थळ पंचनामा तयार करणारे पोलीस हवालदार साबळे, तपासिक अंमलदार कराडे व उर्वरित साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास लेखी तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल सिध्द करता आले नाहीत. तसेच, पंच मोहन यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि पोलीस हवालदार साबळे व पंच शरद यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०६. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, पंच मोहन यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि तक्रारदार, तपासिक अंमलदार कराडे, पोलीस हवालदार साबळे, पंच शरद व उर्वरीत साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे, अभियोगपक्षास आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्ह्याची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. सबब, अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करता आला नाही. म्हणुन मुद्दा क्र.१ करीता मी नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u>** :-

०७. अभियोगपक्षाच्या एकुण साक्षीपुराव्यावरुन आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपीस संशयाचा फायदा देवून त्याची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. म्हणुन, मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: <u>आ दे श</u> ::**

१. आरोपी अनसार अबुसुफियान नदाफ याची महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमालातील एक चिठ्ठी व एक बॉलपेन हे मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने सदर मुद्देमाल अपीलीय कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. जप्त मुद्देमालातील रोख रक्कम रु.१,४४०/- ही रक्कम अपीलीय कालावधीनंतर सरकारजमा करण्यात यावी.

५. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी सहा महिने कालावधीकरीता रक्कम रुपये १५,०००/- किंमतीचे वैयक्तीक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचे एका जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.07.02 17:51:47 +0530

दिनांक : ०२.०७.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.